# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र .८०९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १०/१२/२०१७

**१) दाराची साखळी काढुन टिनाचे पेटीतील नगदी पैसे व सोन्याच्या दागिन्याची चोरी :–**

दिनांक ०८+९/१२/२०१७ चे २१.०० ते ०४.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीचे मागील दाराचे साखळी काढुन कोणीतरी अज्ञात चोराने माज घरात ठेवलेल्या टिनाचे पेटीतील सोन्याची एकदानी १ तोळा, कानातील सोन्याच्या बिऱ्या २ जोड ३ ग्रॅम, कानातील सोन्याच्या बिऱ्या २ जोड ३ ग्रॅम व नगदी १५,०००/रु. असा एकुन २८,०००/रु. चा माल चोरून नेल्याने फिर्यादी बोंडकु महादेव लक्षणे वय ६५ वर्ष रा. पिलांद्री यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ कलम ४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. भोगे पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत

**२) धान खरेदी करून पैसे न देता शेतकऱ्यांची आर्थीक फसवणुक केल्याने गुन्हा नोंद:–**

माहे ०९/२०१७ ते आजपर्यंत यातील आरोपीने गावातील ०६ शेतकऱ्यांकडुन विश्वासात घेवुन १४१०३५०/रु. चे धान खरेदी करून पैसे न देत गावातुन फरार झाला शेतकऱ्यांकडुन आर्थीक फसवणुक केल्याने फिर्यादी दामोधर विश्वनाथ वैरागडे वय ५९ वर्ष रा. चिचाड यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ कलम ४०६,४२० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. किचक पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत

**३) क्षुल्लक कारण वरून काठीने डोक्यावर मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद:–**

दिनांक ९/१२/२०१७ चे ०९.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी व आरोपी हे घराशेजारी राहत असुन यातील फिर्यादीने केलेले कुंपण हा आरोपीने उपडुन फेकला असता, फिर्यादीने आरोपीस तु माझा कुंपण का उपडलास असे हटकले वरून आरोपीने फिर्यादीस माझी जागा आहे म्हणुन, फिर्यादीस भांडण करून शिवीगाळ केली व तुला जे बनते ते कर तुला पाहुन घेईन अशी धमकी दिली व हातात असलेल्या बांबुचे काठीणे फिर्यादीचे डोक्यावर मारून जखमी केल्याने फिर्यादी किसनाबाई धनराज सुर्यवंशी वय ५० वर्ष रा. सकरला यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ३२४,५०४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. मदनकर पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

**४) कॉपर वायरची चोरी करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद:–**

दिनांक ८/१२/२०१७ चे १५.३०ते १६.३० वाजता दरम्यान यातील आरोपी याने चिखलामाईन्स मधील १४/१६ लेवल मध्ये काम्प्रेशन मशिन ला लागलेला जमीनीत गाडलेला कॉपर केबल वायर ३ मिटर चे ३ तुकडे व १ फुटाचे १२ तुकडे असा एकुन १२.६५ मिटर किमती ३२,०००/रु चा माल चोरूननेवुन त्याचे घराचे कंपाउन्ड मध्ये कटर मशीन ने कापत असतांना मिळुन, आल्याने फिर्यादी संजय लक्षमण शेट्टी वय ४७ रा. सितासांवगी यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. मदनकर पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहेत

**५) ट्रकला ठोस मारून नुकशान केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ८/१२/२०१७ चे २२.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी मोहम्मद मुदसीर शेख वय ३१ रा. जळगाव जामोर ता. जळगाव हा आपले आयसर ट्रक क्र. एमएच ३०/एबी ११३९ मध्ये पीयुसर प्लास्टीक पाईप भरून जळगाव जातोर वरून रायपुर येथे एनएच ०६ रोडी नी जात असतांनी ट्रक चे अंटीलेटर वायर निघाल्याने जनसुवीधा केंद्र मानेगाव येथे रोडच्या कडेला पार्कीग इंडीकेटर सरू करून उभे केले असता ट्रक ला मागुन धडक मारून फिर्यादीचे आयसर ट्रक चेप युसी प्लास्टीक पाईप व मागील बॉडी तुटुन अंदाजे १,०००००/रुची नुकसान होवुन आरोपी ट्रक चालक व त्याचे साबतचे दोन ईसमांना जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादीच्या तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९,३३७,३३८ भादवी. सहकलम १८४ मोवका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कोसरे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत

**७)मोटार सायकलच्या धडकेत एक गंभिर जखमी झाल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ४/१२/२०१७ चे १९.१६ वाजता दरम्यान यातील फिर्यादी सत्यपाल रामदास हत्तीमारे वय ३२ वर्ष रा. खातीया जि. गोंदीया हा त्याचे ओळखीचा राजेन्द्र हरीनखेडे रा. निलागोंदी जि. गोंदीया याचे मोटार सायकल क्र. एमपी २८ बीबी ४४७१ वर मागे बसुन एनएच ०६ रोड क्रॉस करीत असता साकोली कडुन लाखनी कडे जाणा–या यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मोटार सायकलला धडक देवुन गंभिर जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने, घटनेची चौकशी केली असता, आरोपी वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हे भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालविण्याचे निष्पन्न झाल्याने पो.स्टे अपघात रजिष्टर क्र. २७/१७ दि. ०४/१२/२०१७ चे २०.३४ वा. नोंद नुसार व फिर्यादीचे दि. ९/१२/२०१७ चे बयान व एमएलसी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९,३३७,३३८ भादवी.सहकलम १८४,१३४(ब)/१७७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कोसरे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत

**८) अज्ञात मोटार सायकलच्या धडकेत एक गंभिर जखमी :–**

दिनांक ०९/१२/२०१७ चे १४.०० वाजता दरम्यान यातील जखमी फिर्यादी बाबुराव गजुगोंड मसराम वय ६५ वर्ष रा. सुरेवाडा हा साईमंदीर कडुन नदीकडे आंघोळ करण्यास पायी जात असता पाठी मागेहुन येणा–या यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन धडक देवुन जखमीचे पायाला गंभिर जखमी केल्याने, जखमीचे बयान व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९, ३३८ भादवी. सहकलम १३४/१८७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गदादे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत

**८) अश्लिल शब्दात शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोदं :–**

दिनांक ०९/१२/२०१७ चे ०६.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही त्याचे घरासमोर ऊभी असतांना यातील आरोपी हा त्याचे वाढीत ऊभा राहुन तु माझ्या वाढीत पाणी का घातलीस, असे बोलुन, भांडण करून अश्लिल शब्दात शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम २९४,५०६ भादवा. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. लिल्हारे पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत

**९) उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु:–**

दिनांक ०८/१२/२०१७ चे २३.३० वाजता दरम्यान यातील मृतक रामचंद्र हिरामन वय ६५ वर्ष रा. इंदीरा नगर अडयाळ याचे छातीत दुखत असल्याने त्यास उपचारा करीता ग्रा.रू. अडयाळ येथे भरती केले असता, उपचारा दरम्यान सदर मृतक हा मरण पावल्याने फिर्यादी अशोक रामचंद्र चाचेरे वय ३६ वर्ष रा. इंदीरा नगर अडयाळ यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. अडयाळ येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. नंदेश्वर पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

**१०) गळफास लावुन इसमाची आत्महत्या :–**

दिनांक ०९/१२/२०१७ चे १४.३० ते १५.०० वाजता दरम्यान यातील मृतक स्वानीद धुर्वा घरडे वय ३३ वर्ष रा. हरदोली याने त्याचे घरी प्लास्टीक केन (रस्सी) ने घरातील पंख्याला गळफास लरवुन आत्महत्या केल्याने फिर्यादी कुनाल धनंजय गजभिये वय २७ वर्ष रा. हरदोली याचे रिपोर्ट वरून पो.स्टे. सिहोरा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. डांगरे पो.स्टे. सिहोरा हे करीत आहेत.

**११) गळफास लावुन इसमाची आत्महत्या :–**

दिनांक ०९/१२/२०१७ चे १६.४५ वाजता दरम्यान यातील मृतक नितीन यादवराव ईश्वरकर वय २६ वर्ष रा. अरविंद वार्ड नेरी हा परमात्मा उक सेवक या मार्गात असुन आज रोजी त्याने दारूचे सेवन केल्याने घरचे लोक काय म्हणनार याची भिती वाटल्याने स्वत:चे राहते घरी बेडरूम मध्ये नॉयलॉन दोरीने गळफास लावुन मरण पावल्याने फिर्यादी निकलेश यादवराव ईश्वरकर वय २४ वर्ष रा. अरवांद वार्ड नेरी रिपोर्ट वरून पो.स्टे. वरठी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भाजीपाले पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

**१२) दारू पिवुन दारूच्या नशेत वाहन चलवीतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद:–**

दिनांक ०९/१२/२०१७ चे १२.५० वाजता दरम्यान यातील आरोपी हा त्याचे ताब्यातील मोटार सायकल क्र. एमएच ३६/आर ६३३३३ ने दारूच्या नशेत दारू पीवुन चालवीतांना मिळुन आल्याने त्याचे ब्रिथ अल्कोहोल ॲनालायझर मशीन द्वारे त्याचा श्वासाचा नमुना घेतला असता ६९.८ एम/१०० एमएल असा मिळाल्याने आरोपी विरूध्द सरतर्फे पोना. जोगेकर वानीशा. भंडारा यांचे रिपोर्ट बरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १८५(१) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी गदादे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत

**१३) अवैध दारू अड्डयांवर धाडी . :–**

दिनांक ०९/१२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन कारधा,लाखांदुर, दिघोरी येथील अवैध दारू अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ४० लिटर हातभट्टी दारू + सडवा मोहा + साहीत्य किंमती १६६५०/–रु. व १३ लिटर ५० मिलीलिटर देशी दारू+ मो.सा. किमती असा एकुन ७०६१२/रु चा माल जप्त करण्यात आला.